महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्रमांक-उशिसं/विधी/प्र.क्र.१२-१८/सीईटीसेल/ ७०२२ दिनांक : 19 JUN 2018

**परिपत्रक -**

**विषय : बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए.बी.एड./बी.एस्सी.बी.एड (एकात्मिक) बीएड-एमएड. (एकात्मिक), विधी ३ वर्षीय अभ्यासक्रम प्रथम वर्ष २०१८-१९ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयांचे नाव नोंदणीबाबत . . .**

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र. उशिसं/विधी/प्र.क्र.१२-१८/सीईटीसेल/६६४२, दिनांक १२.०६.२०१८.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी राज्यातील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ अशासकीय अनुदानित अल्पसंख्यांक/ विद्यापीठ संचलित /विना अनुदानित/ कायम विना अनुदानित अल्पसंख्याक/ कायम विना अनुदानित तत्वावर सुरू असणाऱ्या बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए.बी.एड./ बी.एस्सी.बी.एड. (एकात्मिक ४ वर्षीय), बी.एड.-एम.एड. (एकात्मिक ३ वर्षीय), विधी ३ वर्षीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष सन २०१८-१९ करिताच्या प्रवेशासाठीची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया मध्ये महाविद्यालयाचे नाव नोंदणी करण्यासाठी दिनांक १९.०६.२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

सदरहू प्रकरणी मुदतवाढ देण्याबाबत बहुतांश महाविद्यालयांनी संचालनालयास संपर्क साधला होता. त्यानुषंगाने उक्त नमूद अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सन २०१८-१९ मध्ये सहभागी होण्याकरिता नाव नोंदणी करण्यासाठी दिनांक २२.०६.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. नावनोंदणी अर्जासोबत संदर्भिय परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सहपत्रे या संचालनालयास दिनांक २६.०६.२०१८ पर्यंत पर्यंत पोहोचेल अशा पध्दतीने पाठविण्यात यावीत. शक्यतो सदरहू सहपत्रे खास दूताकरवी संचालनालयास हस्तपोच करण्यात यावीत. **विहीत मुदतीमध्ये आपला प्रस्ताव संचालनालयास प्राप्त न झाल्यामुळे आपल्या महाविद्यालयाचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

**( डॉ. मोहन खताळ )**
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत -

१. प्राचार्य, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र आणि विधी ३ वर्षीय अभ्यासक्रमाची सर्व महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी.

३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

२/- आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.

४. श्री. मोहन ठोंबरे, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

२/- सदरचे परिपत्रक केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.